सातारा न्यूज
निर्भीड व निष्पक्ष बातमी देणारं एकमेव व्यासपीठ
http://esataranews.com sataranewsonline @SataraNews sataranews

# 'सायबर सुरक्षा' बद्दल विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती



**सातारा न्यूज;**
**सातारा :** रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या विशेष प्रकल्पांतर्गत अनंत इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्याचे धडे देण्यात आले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली आहे. या उपक्रमासाठी संस्थेच्या विद्यार्थीनी प्रणाली पवार आणि श्रेया शेडगे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे सायबर गुन्हे, जसे की फायनान्शिअल फ्रॉड, सोशल मीडिया फ्रॉड आणि जॉब फ्रॉड याबद्दल सविस्तर माहिती दिली. एवढंच नव्हे, तर असे गुन्हे घडल्यास कुठे आणि कसे तक्रार करावी, याबद्दलही मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, हे समजून घेण्यास मदत झाली. अनंत इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती शिंदे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

संस्थेचे संचालक डॉ. बी. एस. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला. तसेच, कॉम्प्युटर विभाग प्रमुख डॉ. आर. डी. कुंभार आणि पी. पी. लोखंडे यांनीही या कार्यात महत्त्वपूर्ण सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी सायबर सुरक्षा किती महत्त्वाची आहे, हे सांगण्यासाठी या सर्वांनी विशेष प्रयत्न केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ सायबर गुन्ह्यांची माहितीच मिळाली नाही, तर त्यापासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक पावले कशी उचलावीत, हे देखील शिकायला मिळाले. या प्रकारच्या जनजागृतीमुळे समाज अधिक सुरक्षित बनण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.